# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** पाथर्डी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0420 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**30/04/2026 07:46

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 3 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 238 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिंनाक पासून):** 29/04/2026
   **Date To ( दिंनाक पर्यंत):** 29/04/2026
   **Time From (वेळेपासून):** 11:00 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 18:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 30/04/2026 **Time (वेळ):** 06:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 30/04/2026 06:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

वायव्य, 0.1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पाथर्डी पोस्टे, पाथर्डी ,पाथर्डी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुरेश भिकाभाऊ शिरसाठ

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नाशिक,पाथर्डी,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पोलीस उपअधिक्षक, ,नाशिक,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9922887855

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पोहवा अभयसिंह काकासाहेब लबडे | | | 1. पाथर्डी पोस्टे,पाथर्डी, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | पोक ज्ञानेश्वर मारूती सानप | | | 1. पाथर्डी पोस्टे,पाथर्डी, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
फिर्याद
पाथर्डी पोलीस ठाणे, अहिल्यानगर
दि.३०/०४/२०२६

मी सुरेश भिकाभाऊ शिरसाठ, वय ४२ वर्षे, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक, मो.नं. ९९२२८८७८५१५.
समक्ष सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे पोलीस उपअधिक्षक या पदावर सुमारे १० महिन्यापासुन कार्यरत आहे. दि.२८/०४/२०२६ रोजी आम्हास मा. पोलीस अधिक्षक श्री. भारत तांगडे सो यांनी समक्ष त्यांचे कक्षात बोलावून कळविले की, पाथर्डी ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर येथील तक्रारदार नामे श्री. अक्षय भाउसाहेब मरकड यांनी आमचेशी संपर्क करुन त्यांची एका लोकसेवका विरोधात लाच मागणीची तक्रार असुन, ते दि. २९/०४/२०२६ रोजी पाथर्डी ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर येथे भेटणार असल्याचे सांगुन, तक्रारदार यांचे तकारीप्रमाणे योग्य ती कायदेशिर कारवाई करण्याचे आदेशित केले. त्याअनुषंगाने पोकॉ संजय ठाकरे यांना उपायुक्त (प्रशासन) महानगर पालिका, नाशिक यांना पत्र देवुन त्यांचे विभागाचे दोन पंच साक्षीदार यांना दिंनाक २९/०४/२०२६ रोजी सकाळी ०५.३० वा. आमचे कार्यालयात बोलाविणे बाबत लेखी पत्र दिले. त्याप्रमाणे दोन्ही पंच कामगिरीकरीता ला.प्र.वि. कार्यालय, नाशिक येथे हजर झाल्यानंतर त्यांना आमची व पोकॉ संजय ठाकरे, पोकों योगेश शिंदे अशी सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यांना एका तक्रारदाराची लोकसेवकाविरूध्द लाचमागणीची तक्रार असुन त्याप्रमाणे कारवाई करायची आहे, सदर कारवाईमध्ये आपण पंच म्हणून काम करण्यास तयार आहात काय? याबाबत पंचांची संमती विचारली असता पंचांनी त्यास संमती दिली. आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवश्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील सदस्य असे सर्व साहित्यानिशी शासकीय वाहन कमांक एमएच-१५ जे एस. ३१८६ ने सकाळी ०६.०० वा. निघुन १०.३० वा. चे दरम्यान सिन्नर, समृध्दी महामार्गाने शेवगाव कडुन पाथर्डी येथे हॉटेल शिवनेरी मिसळ या ठिकाणी पोहचलो. त्यानंतर सदर ठिकाणी तक्रारदार हे त्यांच्याकडील दुचाकी स्प्लेंडर वाहन क. एमएच-१६-सीपी-४२०७ या वाहनाने आम्ही थांबलो त्या ठिकाणी आले. आमचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व तकार विचारले असता तक्रारदार यांनी त्यांचे पूर्ण नाव श्री. अक्षय भाउसाहेब मरकड, वय २६ वर्षे, व्यवसाय मजुरी व वाहन चालक, रा. निवडुंगे, ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर मो.नं. ९७६२७८३६३ असे सांगुन त्यांची त्यांनी तकार सांगितली की, ती पुढीलप्रमाणे
समक्ष तकार लिहुन देतो की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहत असुन मी पुणे येथे राधेय ट्रॅव्हल्सवर ड्रायव्हर म्हणुन कामकाज करतो, तसेच मी गावाकडे आल्यावर मजुरी व्यवसाय करून वडीलांना हातभार लावत असतो. दिंनाक ०६/०३/२०२६ रोजी मी चालवत असलेली मोटार सायकल क. एम एच १६ डी फ ८०६५ या गाडीवर देवदर्शनाकरीता मी व माझे दाजी मढी येथे गेलो होतो. मढीवरून परत येत असताना मढी ते तिसगाव रोडवरील सरकार हॉटेल जवळ माझ्या गाडीचा एका बुलेट गाडीला कट लागल्याने आम्ही व बुलेट गाडीवरील व्यक्ती घसरून पडलो होतो. त्यावेळी तेथे उपस्थितीत असलेले लोकांनी आम्हाला दवाखान्यात घेउन गेले होते. तेथे उपचार करून आम्ही घरी आलो होतो. त्यानंतर १५ ते २० दिवसानी माझे चुलते यांचा फोन आला होता, त्यांनी सांगितले की मढी येथे सुभाष मरकड यांनी मला भेटण्यास बोलावले आहे. परंतु मी बाहेरगावी असल्याने मला त्यांना भेटता आले नाही. दिंनाक २४/०४/२०२६ रोजी मला पोलीस स्टेशन पाथर्डी येथील पोलीस हवालदार अभय लबडे यांचा फोन आला असता त्यांनी सांगितले की, दिंनाक ०६/०३/२०२६ रोजी तुझा व सुभाष मरकड यांचा अपघात झाला होता. त्यांनी तुझ्याविरूध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिलेली आहे. त्यामुळे पोलीस स्टेशनला येउन मला भेट असे

सांगितलेवरून मीदिंनाक २५/०४/२०२६ रोजी माझे दाजी यांना पोलीस स्टेशनला पोलीस हवालदार अभय लबडे यांची भेट घेउन माझे विरुध्द काय तक्रार दाखल आहे बाबत विचारपुस करणेस पाठविले असता पोलीस हवालदार अभय लबडे यांनी सांगितले की, तुमचा मेहुणा व तुमची गाडी पोलीस स्टेशनला घेउन या. गाडी जमा करायची आहे व गाडी सोडायची असेल तर त्यासाठी पैसे लागतील त्यांनी असे सांगितल्याने मी दिंनाक २८/०४/२०२६ रोजी पोलीस हवालदार अभय लबडे यांना पोलीस स्टेशन येथे भेटलो असता त्यांनी माझी गाडी जमा केली व तिचे फिटनेस सर्टीफिकेट त्रिमुर्ती अॅटो सर्विसेस येथुन घेउन येण्यास सांगितले व गाडी सोडवायची असेल, तुझ्या जागेवर दुसरा ड्रायव्हर दाखवण्यासाठी व पुढे कोर्टात मदत करण्यासाठी ७,०००/- रूपये तुला मला दयावे लागतील असे सांगितले, गाडी सोडण्यासाठी पैसे लागत नाही हे मला माहित असल्याने पोलीस हवालदार अभय लबडे हे माझेकडे लाचेची मागणी करीत असुन त्यांच्यावर कायदेशिर कारवाई करण्यात यावी. लबडे साहेब व माझेत कोणत्याही प्रकारे उधारी व उसनवारी नाही तसेच भांडण तंटा नाही. श्री. लबडे यांनी माझ्याकडे मागीतलेली लाचेची रक्कम मी माझ्या बचतीतील पैशातुन हजर करेल." अशी तकार सांगितली. आम्ही तक्रारदार श्री. मरकड यांची तकार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. सदर तक्रारी वर तकारदार, आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर तक्रारदार श्री. अक्षय मरकड यांचे तकारीप्रमाणे पाथर्डी पोलीस ठाणे येथे आज उपस्थित असलेले लोकसेवक श्री. अभय लबडे यांची लाचमागणी पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरले, आम्ही लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हॉईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवुन त्याच्या वापराबाबत तक्रारदार श्री. मरकड व दोन्ही पंचांना माहिती समजावून सांगितली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचांची खात्री करून दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक श्री. लबडे हे कोठे भेटतील याबाबत विचारले असता त्यांनी लोकसेवक श्री. लबडे हे पाथर्डी पोलीस ठाणे येथे भेटणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाईबाबत तकारदार श्री. मरकड व पंच नं. १ कामुर्ती यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर आम्ही व्हॉईसरेकॉर्डर चालु करून तक्रारदार श्री. मरकड यांच्या शर्टचे आतमध्ये बनियन ला सेफ्टी पिन लावुन पाउच मध्ये ठेवण्यात आले. आम्ही दिलेल्या सुचने प्रमाणे तक्रारदार हे पंच नं. १ यांचेसह दुचाकी स्लेंडर वाहन क. एमएच-१६-सीपी-४२०७ या वाहनाने लोकसेवक श्री. लबडे यांची भेट घेण्याकरीता पाथर्डी पोलीस ठाणे येथे जाण्याकरीता ११/४६ वाजता रवाना केले. त्यानंतर १३/०९ वाजेच्या सुमारास तक्रारदार व पंच नं. १ आम्ही थांबलो त्याठिकाणी परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही पंच नं. १ यांना लोकसेवक श्री. लबडे यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटने विषयी पंच नं. २ यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तकारदार असे रवाना होउन लोकसेवक श्री. लबडे यांना पाथर्डी पोलीस ठाणे येथे गेलो. त्यानंतर लोकसेवक श्री. लबडे व तक्रारदार यांचेत तक्रारदार यांचे कामाविषयी चर्चा झाली. तक्रारदार यांचे गाडीचे झालेल्या अपघातात लोकसेवक लबडे यांनी गाडी चालवणारा दुसरा कुणी व्यक्ती दाखवतो आणि तुजी गाडी सोडुन देतो व तुला दाखल गुन्हयात मदत पण करतो पण आमचे काय बघ असे बोलेल्यावरून तक्रारदार यांनी तुम्ही सांगा असे लोकसेवक यांना सांगीतले त्यावर लोकसेवक लबडे यांनी तक्रारदार मरकड यांना पाच ते सात हजार रूपये लागतील असे सांगितले. त्यानंतर मी व तक्रारदार मरकड असे तेथुन निघुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. अशा आशयाची हकीकत सांगीतली. गाडी सोडण्याच्या मोबदल्यात व दाखल गुन्हयात मदत करण्याच्या मोबदल्यात स्वतः करीता ५ हजार रुपये लाचेची मागणी केली अशा आशयाची हकीगत सांगितली.

लोकसेवक श्री. लबडे यांनी मागणी केलेल्या लाचेच्या संदर्भाने पाथर्डी पोलीस ठाणे, अहिल्यानगर येथे लाचेचा सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले. आम्ही तक्रारदार यास लोकसेवक लबडे यांना दयावयाची लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता त्यांनी त्यांच्याकडे असलेल्या ५०० रुपये दराच्या १० नोटा असे एकुण ५,०००/- रूपये हजर केल्याने ५ हजार रुपये नोटांचे नंबर पंचासमक्ष लिहून घेण्यात आले. तक्रारदार व पंचाना अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट दिवा यांचे गुणधर्माबाबत माहिती देवुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक आमचे सुचनेवरून पोकों ठाकरे यांनी करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. सापळा कारवाईदरम्यान करावयाच्या कार्यवाही बाबत तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक यांना योग्य त्या सुचना देवुन समजावुन सांगितल्या. लाचेच्या नोटा तक्रारदार यांच्या ताब्यात देवुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यात नवीन मेमरीकार्ड टाकुन तक्रारदार श्री. अक्षय मरकड यांचे शर्टचे आत बनियन ला सेफ्टी पिनने लावुन तक्रारदार व पंच नं. १ यांना लोकसेवक श्री. लबडे यांची भेट घेण्याकरीता पाथर्डी पोलीस ठाणे येथे १७/०६ वाजता दुचाकी स्प्लेंडर वाहन क. एमएच-१६-सीपी-४२०७ ने रवाना केले.त्यांचे पाठोपाठ सापळा पथक शासकिय वाहनाने पाथर्डी पोलीस ठाणे च्या आवारात जावुन सापळा आयोजित केला. त्यानंतर तक्रारदार यांनी लाच स्विकारले बाबतचा पुर्व नियोजीत

इशारा १७/१९ वाजताचे सुमारास केला. लागलीच आम्ही पोकॉ/ ठाकरे, पोकॉ/ शिंदे व पंच नं. २ यांचेसह पोलीस स्टेशनच्या लबडे यांचे कक्षात प्रवेश करताच लबडे यांना संशय आल्याने त्यांनी त्यांचे कक्षात उपस्थित असलेले पोलीस शिपाई ज्ञानेश्वर सानप यांना हाताने पळुन जाण्याचा ईशारा केला असता पोशि/ ज्ञानेश्वर सानप हे सदर कक्षाच्या मागच्या बाजुच्या दरवाज्यातुन पळुन दरवाज्याची बाहेरून कडी लावुन आमचे व पंचासमक्ष पळ काढला असता आम्ही, पोशि/शिंदे तसेच पंच क्रमांक १ अश्यांनी पोलीस स्टेशन च्या समोरून पळत जावुन सानप यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता सानप यांनी पोलीस स्टेशन च्या डावीकडील भिंतीवरून उडी मारून पळुन गेले. तोपावेतो पंच नं. २ व पोशि / ठाकरे यांनी लोकसेवक लबडे यांना ताब्यात घेवुन तकारदार यांना बाहेरून बोलावुन त्यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर मशीन बंद करून ताब्यात घेतले ती वेळ सुमारे १७:२४ वाजेची होती.त्यानंतर आम्ही पंच नं. १ श्री कामुर्ती यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली व कुठे ठेवली आहे? याबाबत विचारले असता पंच नं. १ श्री कामुर्ती यांनी तक्रारदार यांचेसमोर असलेल्या इसमाकडे निर्देश करुन हे लोकसेवक अभय लबडे पोलीस असुन त्यांनी तक्रारदार यांचेकडुन ५,०००/- रु. अ.पा. लावलेली लाचेची रक्कम स्विकारून त्यांचे पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली त्यानंतर लोकसेवक लबडे यांनी तक्रारदार यांना पोकॉ/कळमकर यांचे सोबत पोलीस स्टेशनच्या पाठीमागील बाजुस गाडीकडे जाण्यास सांगितले त्यावेळी मी दरवाज्यात उभे राहुन लोकसेवक यांचेवर बारकाईने लक्ष ठेवुन होतो त्याचवेळी लोकसेवक लबडे यांनी त्यांच्या उजव्या खिशात ठेवलेली रक्कम काढुन तेथे खिडकीजवळ उभे असलेल्या व्यक्तीकडे दिली होते अशी हकीगत सांगीतली.

त्यानंतर आम्ही लोकसेवक अभय लबडे यांना स्वतःची ओळख सुरेश शिरसाठ, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नाशिक अशी सांगुन शासकीय पंचांची व सापळा पथकाची ओळख करून दिली.त्यावेळी आम्ही स्वतः लबडे यांना त्यांचे नांव व पत्ता व पळून गेलेल्या व्यक्ती चे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव अभयसिंह काकासाहेब लबडे, वय ४० वर्षे, पोलीस हवालदार नेमणुक पाथर्डी पोलीस स्टेशन, रा. खंडोबा नगर, विखे पाटील हॉस्पीटल रोड, शेवगाव, ता. शेवगाव जि. अहिल्यानगर असे सांगितले. तसेच कक्षातुन पळुन गेलेली व्यक्ती हि पोलीस शिपाई ज्ञानेश्वर सानप आहे असे सांगितले. तसेच त्यांचेसमोर बसलेले कर्मचारी बाबत विचारले असता ते पोलीस शिपाई गोफणे आहे असे सांगितले. त्यानंतर आम्ही पंच नं. २ श्री भोसले यांना तकारदार श्री मरकड यांनी लोकसेवक लबडे यांना दिलेली लाचेची रक्कम लबडे यांचे पॅन्टच्या खिशात आहे का बघण्यास सांगितले असता पंच नं. २ श्री. भोसले यांनी लोकसेवक लबडे यांच्या पॅन्ट व शर्ट चे खिसे चेक केले असता पंच नं. २ श्री. भोसले यांना सदरची रक्कम मिळुन आली नाही.

सदरवेळी लोकसेवक लबडे यांचे कक्षातील समोरील टेबलावर काम करीत असलेले पोशि/ गोफणे यांना टेबलाजवळ बोलावुन घेवुन लोकसेवक श्री. लबडे यांचे टेबलाजवळील व आजुबाजुचे लाईट बंद करून तात्पुरता अंधार करून लोकसेवक श्री लबडे यांचे हातावर अ. व्हा. दिव्याचा प्रकाश टाकुन तपासले असता लोकसेवक यांनी लोचेची रक्कम स्वतः स्विकारली असल्याने त्यांचे हातास निळसर पांढरट चकाकी दिसुन आली. व लोकसेवक यांनी पॅन्टच्या उजव्या खिशात लोचेची रक्कम ठेवली असल्याने पॅन्टच्या उजव्या खिशावर अ. व्हा. दिव्याचा प्रकाश टाकुन तपासले असता निळसर पांढरट चकाकी दिसुन आली. सदर कारवाईचे फोटोग्राफ घेण्यात आलेले आहेत.

त्यानंतर आम्ही पंच नं. १ श्री. कामुर्ती यांना तक्रारदार मरकड यांचे सोबत लोकसेवक श्री. लबडे यांच्या भेटीसाठी रवाना केले पासून ते लाच स्विकारल्या बाबतचा पुर्वनियोजीत इशारा करेपर्यंतची हकीकत विचारली असता त्यांनी पंच नं. २ श्री. भोसले यांचे समक्ष सांगीतले की,मी तक्रारदार यांचेसह पाथर्डी पोलीस स्टेशन येथे गेल्यानंतर मी व तक्रारदार असे पोलीस स्टेशन ला लोकसेवक लबडे यांच्या कक्षात गेलो असता तेथे लोकसेवक लबडे हजर होते तेथे जावुन तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. लबडे यांची भेट घेतली असता तक्रारदार व लोकसेवक श्री. लबडे यांचेत चर्चा झाली त्यात लोकसेवक श्री. लबडे यांनी हाताने ईशारा करून लाचेची रक्कम मागीतली असता तक्रारदार मरकड यांनी त्यांचे ताब्यात असलेली लाचेची रक्कम लोकसेवक श्री. लबडे यांचे समोर धरली असता लबडे यांनी सदरची लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या उजव्या खिश्यात ठेवली. त्यानंतर तकारदार हे लोकसेवक लबडे यांचेशी चर्चा करत असतांना लोकसेवक लबडे यांनी पोलीस ड्रेस मधील कर्मचाऱ्यास तक्रारदार यांच्या गाडीची चावी पाहुन ती गाडी त्याचे ताब्यात दे असे बोलुन तकारदार ला त्यांचे सोबत गाडी लावलेल्या ठिकाणी पाठवले मी मात्र दरवाज्या जवळ उभा होतो व लोकसेवक लबडे यांच्या हालचालीवर लक्ष ठेवुन होतो तेव्हा लोकसेवक लबडे यांनी सदरची रक्कम खिडकिजवळ उभ्या असनाऱ्या व्यक्ती कडे दिली. बाहेर जाताना तक्रारदाराने दिलेल्या ईशाऱ्यावर आपण, पोका /ठाकरे, पोका / शिंदे व पंच नं.२ असे कक्षात आले बरोबर आपन आल्याची चाहुल लागताच खिडकी जवळ उभा असलेला इराम हा रूम च्या कॉर्नर कडे जावुन आपन थांब म्हणताच तो बाहेर जावुन दरवाज्या बाहेरून कडी लावुन तो पळाला तेव्हा भी, पोकों/शिंदे व आपन पुढच्या बाजुने गेलो असतो तो आपल्यासमोर पोलीस स्टेशनच्या डाव्या बाजुच्या कंपाउड वरून पळुन गेला इत्यादी हकिकत पंच नं १ यांनी सांगीतली.

त्यातंर तक्रारदार यांन पंच नं. १ सोबत श्री लबडे यांच्या भेटीसाठी खाना केलेपासुन ते व्हाईस रेकॉर्डर बंद करेपर्यंतची हकिगत पंच नं. २ यांचेसमक्ष विचारली असता त्यांनी पंच नं. ०१ प्रमाणे मिळतीजुळती हकीकत सांगीतली व कळमकर बरोबर मोटार सायकल कडे जातांना मी पोलीस स्टेशन च्या दरवाज्यातुन शर्टच्या दोन्ही बाह्या वरती करून ईशारा केला होता. मी पोलीस स्टेशन च्या मागे मोटार सायकल जवळ असतांना एक व्यक्ती घाईने दरवाज्या लावुन पळत जावुन कंपाउंड चढला तेव्हा पोकों/ शिंदे यांनी पकडा असा आवाज दिला तोपावेतो तो आमचे समोरून पळुन गेला. त्यानंतर पाकों/ठाकरे यांनी मला रूम मध्ये बोलावुन व्हाईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर आंम्ही पंच सापळा पथक लोकसेवक अभय लबडे यांना ताब्यात घेवुन सरकारी वाहनाने शासकीय विश्राम गृह, पाथर्डी येथे घेवुन आलो व तेथील कक्षात पंचनाम्याचे कामकाज केले.

तरी लोकसेवक श्री. अभयसिंह काकासाहेब लबडे, वय ४० वर्ष पद पोलीस हवालदार, वर्ग ३, कार्यालय -पाथर्डी पोलीस ठाणे, जि. अहिल्यानगर यांनी दिनाक २४/०४/२०२६ रोजी पाथर्डी पोलीस ठाणे येथील गु.र.नं ३९९/२०२६ मधील आरोपी श्री. अक्षय मरकड यांची दुचाकी गाडी सोडण्याच्या मोबदल्यात व दाखल गुन्हयात मदत करण्याच्या मोबदल्यात दिनाक २९/०४/२०२६ रोजी तक्रादार अक्षय मरकड यांचेकडुन लोकसेवक श्री. अभयसिंह काकासाहेब लबडे, पोलीस हवालदार यांनी स्वतः करीता पंचा समक्ष ७०००/- रुपये लाचेच्या रक्कमेची मागणी करुन, लाच स्विकारण्याचे मान्य केले. तसेच लोकसेवक अभय लबडे यांनी मागणी केलेली लाचेची ७०००/रूपये पैकी तडजोडअंती ५ हजार रूपये रक्कम हि दिनाक २९/०४/२०२६ रोजी १७:२० वाजता पाथर्डी पोलीस ठाणे मधील कक्षात पंचासमक्ष स्विकारली व लोकसेवक लबडे यांचे मदतनिस पोकों / ज्ञानेश्वर सानप यांचेकडे सदर लोचेची रक्कम ५ हजार रू. देवुन त्यांना पळून जाण्यास मदत केली म्हणुन माझी लोकसेवक पोहवा / २२५३ अभयसिंह काकासाहेब लबडे व पोकों/१०५३ ज्ञानेश्वर मारूती सानप यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम सन १९८८ चे कलम ७,१२ प्रमाणे तसेच भारतीय न्याय संहिता चे कलम २३८ प्रमाणे कायदेशीर फिंयाद आहे.

माझी वरील फिंयाद मी वाचुल पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

हे लिहुन दिले

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

vilas sahadu pujari(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): vilas sahadu pujari
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ठाणे अंमलदार
पाथर्डी पोलीस स्टेशन